आर. सी. एस.  क्रमांक २२/२०२२
कल्याण वि. कार्यकारी अभियंता
CNR No. MHOS140001872022

# निशाणी क्र. १३  वरील आदेश

प्रस्तुतचे प्रकरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्या विरुद्ध नुकसान भरपाईची रक्कम वसुल करण्याकरिता दाखल आहे. यात प्रतिवादी क्रंमाक १ ते ३ हे दिनांक २० जुलै, २०२३  रोजी या न्यायालयात हजर झाले आहेत. परंतु त्यांनी मुदतीत कैफियत दिली नसल्यामुळे दिनांक ०५ डिसेंबर २०२३ रोजी त्यांच्या विरुद्ध निशाणी क्रमांक १ खाली विना कैफियत प्रकरण चालविण्याचा आदेश केला आहे. त्यानंतर तब्बल ७ ते ८ महिन्यानंतर प्रतिवादी क्रमांक २ यांनी निशाणी क्रमांक १३ खाली अर्ज देऊन त्यांच्या विरोधात विना कैफियत चा आदेश रद्द करावा अशी विनंती केली त्यावर वादी यांनी आक्षेप घेतला.

२.		वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्रमांक २ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, बदली व प्रशासकीय कारणामुळे कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. परंतु या प्रकरणात ते पुरावा देऊन प्रकरण लवकरात लवकर चालवून घेतील असे त्यांनी म्हणणे मांडले. याउलट वादीच्या विधीज्ञांनी त्यांनी दाखल केलेला जबाब हाच त्यांचा युक्तीवाद समजावा असे सांगितले.

३.		यातील प्रतिवादी हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी आहेत. त्यांच्या प्रशासकीय अडचणीमुळे त्यांना या प्रकरणात कैफियत दाखल करता आली नाही. त्यांनी ऊशीरा कैफियत देऊ केली आहे. परंतु या गोष्टीला ७ ते ८ महिन्यांचा कालावधी होऊन गेला आहे व त्यामुळे प्रकरण ७ ते ८ महिने लांबणीवर पडले आहे. यासाठी प्रतिवादी हे जबाबदार आहेत. परंतु प्रतिवादीच्या विधीज्ञांनी या कोर्टासमोर असे सांगितले आहे की, यापुढे या प्रकरणात विलंब होणार नाही याची

ते काळजी घेतील आणि वेळोवेळी पुरावा देऊन प्रकरण चालवून घेतील. त्यांच्या तोंडी शब्दावरुन या प्रकरणात कॉस्ट न करता प्रतिवादी क्रमांक २ यांच्या विरुद्ध **झालेला विना कैफियतचा आदेश तोंडी Undertaking वरुन रद्द करण्यात येतो** व प्रतिवादी क्रमांक २ यांना कैफियत दाखल करण्याची संधी देण्यात येते.

RAJU TUKARAM INGLE

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2024.07.24 11:27:00 +0530

दिनांकः–२३.०७.२०२४

**(आर. टी. इंगळे)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 23-07-2024 |
| Order signed by the presiding officer on | - | 23-07-2024 |
| Order uploaded on | - | 24-07-2024 |